राजापेक्षा बुद्धिमान

कॅमेरून देशाची लोककथा

लेखिका:
कॅटरीन चॅन



चित्रे:
ट्रीना हेमन

राजापेक्षा बुद्धिमान


मराठी अनुवाद: सुशील मेन्सन





सात गावांच्या राज्यात एक पुरूष आणि एक स्त्री राहात होते. ते साधेसुधे शेतकरी होते. ते नेहमी आनंदात असत. त्यांना मूलबाळ नव्हते एवढेच एक दु:ख होते. अखेरीस त्यांना एक कन्यारत्न झाले. तिचे नाव त्यांनी *मान्ता* ठेवले.

हळूहळू त्यांना जाणवले की मान्ता एक असामान्य मूल होते. वयाला एक वर्ष पूर्ण होण्याआधीच ती बोलू-चालू लागली होती.




वयाची दोन वर्षे पूर्ण होण्याआधीच ती सातही गावांच्या भाषा बोलू लागली. अगदी प्राण्यांशीसुद्धा बोलू लागली ती! तीन वर्षांची असताना, ती तिच्या आईवडिलांसाठी जेवण बनवू लागली. गावकरी मान्ताची बुद्धिमत्ता पाहून आश्चर्यचकीत होऊ लागले. ती राजापेक्षाही बुद्धिमान आहे, असे लोक म्हणू लागले कारण ती राजापेक्षा जास्त हुशार होती.

लवकरच या मुलीची बुद्धिमत्ता राजाच्या कानावर गेली.

“असं कसं होऊ शकतं?” त्याच्या मनात आले. “एवढीशी पोर, चार वर्षांची सुद्धा नाही ती. माझा अपमान आहे हा!”

“जा आणि त्या मान्ता नावाच्या छोकरीला शोधा,” त्याने सैनिकांना आदेश दिला. “तिला मूर्ख गावकरी माझ्यापेक्षा बुद्धिमान म्हणतात. तिला जंगलाच्या खूप आत न्या आणि तिथेच सोडून परत या. साप आणि वाघ तिचं काय करायचं ते करतील.”




एकदा मान्ताचे आईवडील शेतात गेलेले असताना राजाचे सैनिक त्यांच्या घरी गेले. त्यांना येताना बघून मान्ताने लगबगीने चुलीतील राख काढून एका पिशवीत भरली. पिशवीला एक भोक पाडून तिने ती आपल्या कंबरेला बांधली.

राजाला क्रोधित करणाऱ्या या छोट्याशा मुलीला पाहून सैनिक हसू लागले. तिला उचलून ते जंगलाच्या बरेच आतपर्यंत गेले आणि तिथेच तिला सोडून दिले. ते गेल्यावर, बुद्धिमान मान्ता पिशवीच्या भोकातून पडलेल्या राखेचा माग घेत चालू लागली. लवकरच ती आपल्या घरी सुरक्षितपणे पोहोचली.








काही वर्षे निघून गेली. राजापेक्षा बुद्धिमान मान्ता अधिकाधिक हुशार होत गेली. तिने शेतकऱ्यांना पिकांची पेरणी करण्याची नवनवी तंत्रे सुचवली. त्यीमुळे शेतकऱ्यांना पूर्वीपेक्षा दुप्पट पीक मिळू लागले. मग तिने एक कोयता तयार केला. त्यामुळे पिकांची कापणी पूर्वीपेक्षा निम्म्या वेळात करता येऊ लागली.

मान्ता बरीच लोकप्रिय झाली. काही समस्या आली की लोक तिच्याकडे सल्ला मागायला येऊ लागले.

राजाने अफवा ऐकली की आपल्यापेक्षा बुद्धिमान छोकरी अजून जिवंत आहे. तो क्रोधित झाला आणि तिच्यापासून कायमची सुटका करून घेण्याचा निश्चय त्याने केला. त्याने सैनिकांना राजवाड्यामागे एक खड्डा खोदण्याचा आदेश दिला. मान्ताला त्या खड्ड्यात कैद केले तर ती त्यातच तहानभुकेने मरेल, असा त्याचा अंदाज होता.

सैनिक खड्डा खोदत आहेत, हे मान्ताने ऐकले. राजाच्या मनात काय आहे, याचा अंदाज तिला आला. त्या रात्री तिचे आईवडील झोपेत असताना, ती बाहेर गेली आणि आपल्या चिचुंद्री मित्रांवर तिने एक काम सोपवले.

काही दिवसांनी सैनिक मान्ताला घेऊन जाण्यासाठी आले. तिचे आईवडील रडू लागले, पण मान्ता निर्भयपणे त्यांच्यासोबत गेली. सैनिकांनी तिला खड्ड्यात टाकल्यावर तिने चिचुंद्री मित्रांनी खोदलेले भुयार शोधले. त्या भुयारातून रांगत रांगत ती पुन्हा घरी पोहोचली.



मान्ता यावेळीसुद्धा युक्ती करून सुटली, हे लक्षात येताच राजाचा जळफळाट झाला. त्याच्या मनात आले, ही छोटी मुलगी नक्कीच खूप बुद्धिमान असली पाहिजे, तिला आपल्याजवळ ठेवावे, म्हणजे तिच्यावर नजर ठेवता येईल. त्याने मान्ताला राजवाड्यात येऊन राहाण्याची आज्ञा केली. राजवाड्यात राजाने मान्ताला कपडे धुण्याच्या आणि धान्य भरडण्याच्या कामात व्यस्त ठेवले.

दिवसभर काम केल्यावर संध्याकाळी राजा मान्ताला त्याचा हुक्का आणायला सांगत असे. हुक्का ओढत असताना तो राज्यातील समस्यांबाबत स्वत:शीच बोलत बसे. मान्ता राजाच्या मागे गुपचुप ऐकत उभी असे. राजाचे बोलून झाल्यावर, ती त्याला उपाय सुचवत असे. राजा तिचे चांगले सल्ले मानत असे. त्यामुळे सात गावांतील लोक आनंदी आणि समृद्ध झाले.





एकदा एक दूत राजाकडे आला. “दूरदेशीचा एक शक्तिशाली सम्राट त्याच्या मुलीचं लग्न एका योग्य वराशी करून देऊ इच्छितोय,” तो म्हणाला. राजाला अत्यानंद झाला. सम्राटाच्या मुलीशी लग्न करून आपली संपत्ती आणि पत कैक पटींनी वाढेल, हे त्याच्या लक्षात आले. म्हणून तो सम्राटाच्या दरबारात जाण्याची तयारी करू लागला.

राजाने दहा विश्वासू सैनिक आणि त्यांचा स्वयंपाक करण्यासाठी मान्ता या सर्वांना सोबत घेतले. त्यांनी समुद्रात तीन दिवस, तीन रात्री प्रवास केला.

सम्राटाने राजा आणि त्याच्या सोबत आलेल्या लोकांचे स्वागत केले. त्याने त्याची मुलगी, *तिताया*, हिला बोलावले आणि सर्वांशी परिचय करून दिला. तिताया वयाने लहान असली तरी संध्यासमयीच्या ताऱ्यासारखी सुंदर दिसत होती.

इतक्या सुंदर मुलीसोबत लग्न करण्याचा विचार करून राजा रोमांचित झाला. “सम्राट,” तो बोलू लागला, “मी तुमच्या मुलीचा एखाद्या मौल्यवान रत्नासारखा काळजीपूर्वक सांभाळ करीन.”



“कदाचित सांभाळालही,” सम्राट उत्तरला. “पण ती अजून खूप लहान आहे. ती लग्नायोग्य व्हायला अजून काही वर्ष अवकाश आहे. तुम्ही तिचा चांगला सांभाळ कराल असं म्हणताय, त्याचं प्रमाण काय?”

“जन्मापासून तितायाला फारशी भूक लागत नाही. तिच्याशी लग्न करायचे असेल तर तिला नीट खाऊपिऊ घालाल, हे सिद्ध करा.”


राजाने मान्ताला तितायासाठी चविष्ट जेवण बनवण्याची आज्ञा केली. मान्ताने भात, कोंबडीचे मांस आणि सूप, केक आणि भाज्या बनवल्या. तिने आंबे, केळी, नारळ आणि शेंगदाणे गोळा केले. जेवण तयार झाल्यावर, राजाने तितायाला बोलावले.


“बघ, हे चविष्ट जेवण खास तुझ्यासाठीच बनवून घेतलंय मी,” राजा तिला म्हणाला. “ये आणि खाऊन बघ.”

पण तितायाने फक्त खांदे उडवले. “मला भूक नाही,” ती म्हणाली.

“थांब, तिताया,” मान्ताने तिला थांबवले. “मला काही दाखवायचंय तुला,” म्हणत मान्ताने आपल्या कंबरेवर बांधलेली दोरी सोडवली. दोरीतील घंट्या वाजू लागल्या.









घंट्यांचा आवाज ऐकून तिताया आनंदीत झाली. ती घंट्यांसोबत खेळू लागली. ती तोंड उघडून हसू लागली आणि मान्ताने पटकन आंब्याची एक फोड तिच्या तोंडात सरकवली. छोटी राजकुमारी घंट्या खेळण्यात इतकी दंग झाली होती की नकळतच तिने आंब्याची ती फोड चावूनचावून खाऊन टाकली. अशाच रितीने मग मान्ताने तिला कोंबडीचे मांस खायला घातले. हळूहळू तिने तितायाला सर्व जेवण खाऊ घातले.

सम्राटाने मान्ताकडे पाहून स्मित केले. “खूप हुशार आहेस तू. तू माझ्या मुलीची योग्य काळजी घेशील, असं मला वाटतं.”

त्याक्षणीच क्रोधाने लाल झालेल्या राजाने मान्ताला मारण्यासाठी आपला कोयता उगारला.

“थांबा, महाराज,” मान्ता त्याच्याकडे कुजबुजली. “सम्राटापुढे असं काही कृत्य करू नका. मी तुमच्यासोबत राजवाड्यात राहाते, हे विसरू नका. माझ्या मालकीचं सारं तुमचंच आहे, अगदी ही छोटी राजकुमारीसुद्धा! तिताया मोठी झाल्यावर तुम्ही तिच्याशी लग्न करू शकता.”



राजाला मान्ताच्या शब्दांमधील प्रामाणिकपणा उमगला. त्याने मान्ताला छोट्या राजकुमारीला आपल्या राजवाड्यात आणण्यास परवानगी दिली.



ते सगळे सम्राटाच्या राज्यातून परत निघाले, तेव्हा समुद्र शांत होता. पण नावेत बसल्यावर, एका महाकाय लाटेमुळे नाव बुडण्याची पाळी आली. त्या लाटेमागून एक भयंकर समुद्री दैत्य पुढे आला. तो *बाओबाब* झाडापेक्षाही विशाल होता आणि त्याला सात डोकी होती. त्याचे प्रत्येक तोंड आग आणि वाफ ओकत होते.

“राजकुमारी कुठाय?” समुद्री दैत्य गरजला. “तिला माझ्याकडे सोपवा.”



सैनिकांनी बाण सोडून त्याला मारण्याचे प्रयत्न केले. पण सारे बाण त्याच्या जाडजूड त्वचेवर आपटून समुद्रात पडले.


“त्याच्या डोळ्यांत बाण मारा,” मान्ता ओरडली. पण त्या दैत्याने सैनिकांना घाबरवून सोडले. सैनिकांचे हात कापू लागले. त्यामुळे बाणांचे नेम चुकले.. शेवटी एकच बाण उरला. पण दैत्याची अजूनही चार डोकी शिल्लक होती.“

"आता काय करायचं?" सैनिकांनी राजाला विचारले.

"राजकुमारीला दैत्याकडे सोपवून टाका," राजा भयभीत होऊन ओरडला. "आपण आपला जीव वाचवूया."

पण राजापेक्षा बुद्धिमान मान्ताने असे होऊ दिले नाही. "मला द्या तुमचं धनुष्य," तिने शेवटचा बाण हातात धरलेल्या सैनिकाला आदेश दिला. "मी या दैत्याला संपवून टाकते."

राजा तिच्यावर ओरडला. "तू? तू काय करणार?" पण सैनिकाने मान्ताला आपले धनुष्यबाण देऊन टाकले.



मान्ता समुद्री दैत्यासमोर उभी राहिली. तिने धनुष्यबाण आपल्या मागे लपवले. मग ती अचानक जोरजोरात ओरडू लागली. "हे काय, हे काय, आधी तू आलास, मग तुझ्या भावालासुद्धा आणलंस. आता काय होणार आमचं?"

ते ऐकून समुद्री दैत्य चकीत झाला. आपणंच एकमेव दैत्य आहोत, अशी त्याची समजूत होती. त्याने उजवी-डावीकडे बघितले. मग त्याने आपली डोकी सर्व दिशांना वळवून आपल्या कथित भावाची झलक बघण्याचा प्रयत्न केला.


“अजून दिसला नाही तुला?” उजवीकडे बोट दाखवत मान्ता म्हणाली. “तो बघ तिकडे, तुझ्यापेक्षाही मोठा आहे तो. अरे बापरे!”

दैत्याने आपली चारही डोकी मान्ताने दाखवलेल्या दिशेत वळवली. त्याचे सर्व डोळे एकाच दिशेत येताच, मान्ताने धनुष्य उचलले आणि नेम धरला. एकाच बाणाने तिने दैत्याचे आठही डोळे भेदले. आग ओकत असलेली त्याची भयंकर डोकी घेऊन दैत्य समुद्रात खोलवर बुडाला.





राजकुमारी तितायाला घेऊन सर्व प्रवासी सात गावांमध्ये परतले. सर्व गावकरी त्यांचे स्वागत करण्यास आणि प्रवासाची हकिकत ऐकण्यास पुढे आले. राजाने सर्वांना सांगितले की त्याने राजकुमारीला जिंकून आणले आहे आणि सर्वांना भयानक समुद्री दैत्याच्या तावडीतून सोडवले आहे. पण राजाच्या भेकड वागण्याचा आणि अप्राणिकपणाचा वीट आलेल्या सैनिकांनी सर्वांना सत्य कहाणी ऐकवली. मान्ताचे शौर्य आणि शहाणपण यांमुळेच ते जिवंत आहेत, हे त्यांनी गावकऱ्यांना सांगितले.





खरी हकिकत कळल्यावर गावकऱ्यांनी राजाला राजवाड्याबाहेर काढून सात गावांच्या वेशीबाहेर हाकलून दिले. मग त्यांनी मान्ताला राज्याची राणी बनवले.

राणी मान्ताने आपल्या अंगभूत हुशारीने राज्यकारभार उत्तमपणे सांभाळला. तिने तितायाला प्राण्यांशी कसे बोलायचे, ते शिकवले. छोट्या राजकुमारीने जंगली पशुंना आपले मित्र बनवले. मान्ताच्या राज्यात सात गावांत सर्वत्र शांतता आणि समृद्धी नांदू लागली.

